महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖२९ जून २०२५ ❖वर्ष - सातवे ❖अंक ००८❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024







## पावसामुळे भाज्या महागल्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : अवकाळी पावसामुळे शेतकरी आणि ग्राहक दोघेही अडचणीत आले आहेत. त्याचा थेट परिणाम बाजारपेठांवर दिसून येत आहे. पावसामुळे भाजीपाल्याचे उत्पादन घटल्याने अनेक भाज्यांचे दर दुपटीने वाढले आहेत. त्यामुळे सामान्य ग्राहकांचा कल आता कडधान्यांकडे वळू लागला आहे. मूग, मटकी, उडीद, हुलगा, काबुली चणे यांसारख्या कडधान्यांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाली आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून कोकण, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड अशा भागांत आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. टोमॅटो, वांगी, कारले, भेंडी, कोथिंबीर, कोबी, फ्लॉवर, मिरची यांसारख्या भाज्यांचे उत्पादन कमी झाल्यामुळे बाजारात पुरवठा घटला आणि त्याचे दर गगनाला भिडले. काही भागांत टोमॅटोचे दर ८० रुपये किलो तर भेंडी, कारल्यासारख्या भाज्या १०० रुपये किलोच्या आसपास पोहोचल्या. दरवाढ लक्षात घेता सामान्य नागरिकांनी रोजच्या स्वयंपाकासाठी भाज्यांऐवजी डाळी, उसळ आणि इतर कडधान्यांचा अधिक वापर करायला सुरुवात केली आहे. भाजीपाल्याच्या तुलनेत डाळी, उसळी व कडधान्ये स्वस्त, पौष्टिक व टिकाऊ असल्याने त्याचा पर्याय म्हणून स्वयंपाकात वाढता वापर होत आहे. विशेषतः वर्क फ्रॉम होम किंवा होममेड फूडकडे वाढलेली रुची लक्षात घेता, कडधान्यांचा वापर वाढल्याचे दिसून येते.

गृहिणींच्या मते दररोज भाजी घेणे आता शक्य होत नाही. त्यामुळे मूग चवळीच्या उसळी, डाळी आणि खिचडी यांचा वापर स्वयंपाकात वाढवला आहे. त्यामुळे बाजारात कडधान्यांची मागणी वाढली असून, त्याचेही भाव काहीसे वाढले आहेत.

### कडधान्यांचे भाव (प्रतिकिलो रुपयांत)



- **हिरवा वाटाणा** – १३०
- **मूग** – १५०
- **मटकी** – १५०
- **हुलगा** – ६०
- **वाटाणा** – ८०
- **उडीद डाळ** – १२५
- **काबुली चणे** – १४०
- **तुरीची डाळ** – १८०
- **मुगाची डाळ** – १२०

# कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे आज मतदान

## मतदान आणि मतमोजणी एकाच दिवशी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : ठाणे जिल्ह्यातील महत्वाची असलेल्या कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदाच्या १८ जागा पैकी हमाल व मापारी या एका पदाची बिन विरोध निवड झाल्या नंतर उर्वरित १७ जागांसाठी ५१ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे राहिले असून रविवारी २९ जून रोजी होणाऱ्या निवडणूकीत आपले नशीब आजमावणार आहेत. संचालन मंडळाच्या विविध वर्गातून निवडणून दिल्या जाणाऱ्या १७ जागा साठी आपले उमेदवार निवडणून आणण्यासाठी राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी केली असून महायुती,महा आघाडी पक्षाने कंबर कसली असून आजी माजी आमदारांनी ही निवडणुकीत प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सहभाग आपल्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी वर्चस्व पणाला लावल्याने बाजार समितीची निवडणुका चांगलीच चुरशीची होणार असल्याचे दिसून येत आहे .

ठाणे जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाची महत्वाची कृषी उत्पन्न बाजार समिती म्हणून कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती ओळखली जात आहे.या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या कार्यकारिणीच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कालावधी गेल्या वर्षी संपुष्टात आल्याने दोन वेळा सहा सहा महिन्याची मुदत वाढ दिल्या नंतर अखेरीस राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे मान्यतेने निवडणूक निर्णायक अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था कल्याण चे निवडणूक अधिकारी यांच्या मान्यतेने कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या १८ जागा साठी निवडणूक जाहीर करण्यात आला असून संचालक पदाच्या निवडणुकीच्या कार्यक्रमाला सुरवात झाली व २९ जून २०२५ रोजी निवडणुका होणार आहे.

बाजार समितीच्या १८ संचालन पदाच्या जागा करिता कृषी पत व बहुद्देशीय सह संस्था (सर्वसाधारण गट) ७ जागांसाठी १५ उमेदवार,कृषी पत व बहुद्देशीय सह संस्था ( महिला राखीव) २ जागांसाठी ४ उमेदवार,कृषी पत व बहुद्देशीय सह संस्था (इतर मागासवर्ग) १ जागेसाठी २ उमेदवार,कृषी पत व बहुद्देशीय सह संस्था ( भटक्या जाती- जमाती ) १ जागेसाठी ३ उमेदवार,ग्रामपंचायत (सर्वसाधारण) २ जागेसाठी ८ उमेदवार,ग्रामपंचायत (अनु. जाती- जमाती) १ जागेसाठी २ उमेदवार,ग्रामपंचायत (आर्थिक दुर्बल) १ जागेसाठी ३ उमेदवार,व्यापारी आडते २ जागेसाठी १३ उमेदवार व हमाल व तोलाई एक जागेसाठी बिनविरोध निवड झाल्याने उर्वरित १७ जागा साठी तब्बल ५१ इच्छुक उमेदवार निवडणुक रिंगणात उभे राहिले असून रविवारी २९ जून रोजी १७ जगासाठी बाजार समितीच्या संचालक पदाची निवडणूक होणार आहे.

**या निवडणुकीत व्यापारी अडते गटासाठी सर्वाधिक १७०० पेक्षा जास्त मतदार असून या मतदाराचा कौल कोणाला यासाठी धडपड सुरु आहे.**

या निवडणुकीसाठी कपिल थळे, मयूर सुरेश पाटील, रवींद्र नारायण घोडविंदे ,मोहन मुरलीधर नाईक, शाहिद अब्दुल रजाक मुल्ला ,मधुकर मोहपे सौ विद्या अरुण पाटील योगेश किसन धुमाळ , हे माजी संचालक या होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी संचालक पदावर निवडून येण्यासाठी निवडणूक लढवीत आहेत. बाजार समितीच्या संचालक पदाच्या निवडणुकीत महायुती पक्षा ने शेतकरी सहकारी विकास पॅनल उभे केले असून या पॅनल मध्ये भाजपा ,शिवसेना( शिंदे गट) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या पक्षातील पदाधिकारी,इच्छुक उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उभे आहेत या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी भाजपाचे आमदार किसन कथोरे,राष्ट्रवादी

## आजी माजी आमदारांची प्रतिष्ठा पणाला ....

काँग्रेस (अजित पवार गटाचे )प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव,तर शिवसेना शिंदे गटाचे ठाणे ग्रामीण जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील यांनी कंबर कसली असून ,आमदार किसन कथोरे यांनी कृषी पत संस्था, ग्रामपंचायत या गटावर लक्ष केंद्रीत केले असतानाच माजी आमदार नरेंद्र पवार आणि प्रकाश भोईर यांनी व्यापारी एकता परिवर्तन पॅनलसाठी प्रयत्न चालवल्याने भाजपातील दोन गट प्रकर्षाने समोर आले आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार सुरेश म्हात्रे आग्रही असून त्यांनी प्रचार सभे दरम्यान मतदारांवर आश्वासनाचा पाउस पाडला आहे.त्यांनी आपल्या इच्युक उमेदवाराला निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील असून अपक्ष उमेदवार देखील आपापल्या परीने प्रचार करत आहेत. बाजार समितीचे संपूर्ण आवार प्रचाराच्या बॅनरनी भरून गेले असून समितीच्या आवारात साचलेल्या चिखलाची पर्वा न करता उमेदवार आणि राजकीय नेते मतदाराची मनधरणी करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे बाजार समितीची निवडणुका चांगलीच रंगतदार होणार असून आजी माजी आमदार आप आपल्या पॅनल मधील उमेदवार निवडून आणण्यासाठी त्यांनी ही निवडणुका प्रतिष्ठेची केली आहे.

रविवारी २९ जून रोजी निवडणुकी नंतर लगेचच होणाऱ्या मतमोजणीतून स्पष्ट होणार आहे. होऊ घातलेल्या पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बाजार समितीवर राजकीय पक्षाचा झेंडा रोवण्यासाठी राजकीय नेत्यांनी बाजार समितीच्या आवारातील चिखल तुडवत प्रचाराचा धुरळा उडवला आहे. आज मतदान झाल्यानंतर त्याच ठिकाणी सायंकाळी पाच वाजता मतमोजणी सुरु केली जाणार आहे.

# ठाण्यात आनंद दिघेंचा पुतळा उभारणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी त्यांचे राजकीय गुरू आणि ठाण्याचे दिवंगत शिवसेना नेते आनंद दिघे यांचा 43 मीटर उंच भव्य पुतळा ठाण्यात उभारण्यात असल्याची घोषणा केली. ठाण्यात शिवाजी मैदानाजवळील घड्याळ टॉवरच्या पुनर्रचनेच्या भूमिपूजन सोहळ्यादरम्यान त्यांनी हा महत्त्वाचा निर्णय जाहीर केला.

2022 साली शिवसेनेचं नेतृत्व स्वीकारल्यानंतर जवळपास तीन वर्षांनी त्यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

### शिवाजी मैदानात उभा राहणार 'धर्मवीर आनंद दिघे टॉवर'

एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालेल्या भूमिपूजन कार्यक्रमात त्यांनी सांगितले की, "दिघे साहेबांच्या आशीर्वादानेच मी मुख्यमंत्री होऊ शकलो. त्यांच्या स्मृतीला अजरामर करण्यासाठी कोणतीही आर्थिक अडचण येणार नाही. धर्मवीर आनंद दिघे टॉवर हा ठाण्याच्या तलावपाळीजवळील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात पुन्हा उभारण्यात येणार आहे. या टॉवरमध्ये आनंद दिघे यांचा 43 मीटर उंच 'किंग-साईज' पुतळा असणार आहे. शिंदे यांनी जाहीर केले की, "दिघे आणि ठाणे हे समानार्थी शब्द आहेत. त्यांनी ठाणे आणि परिसरात शिवसेनेचा भक्कम बालेकिल्ला उभा करण्यासाठी घेतलेली मेहनत आणि शहराच्या विकासात दिलेले योगदान विसरता येणार नाही." या स्मारकासाठी 11 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुतळ्याबरोबरच नागरिकांसाठी विविध सुविधा, सौंदर्गीकरण, आणि स्मृतीस्थळ विकास कामे करण्यात येणार आहेत.

### ठाणे रेल्वे स्थानक परिसराचा सौंदर्गीकरण प्रकल्पही सुरू

दरम्यान, शहरातील इतर नागरी प्रकल्पांचाही शुभारंभ या सोहळ्यावेळी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. शिंदे यांनी ठाणे पश्चिम रेल्वे स्थानकाच्या बाहेरच्या परिसराचे सौंदर्गीकरण प्रकल्पालाही सुरूवात केली. यामुळे पादचाऱ्यांची व वाहनांची वाहतूक अधिक सुलभ होणार आहे.

या प्रकल्पाचा खर्च: 4 कोटी रुपये

या कामामध्ये- रिक्षा व टॅक्सीस्थानकांचे नुतनीकरण, फुटपाथ दुरुस्ती व सुधारणा, माहिती फलक लावणे, झेब्रा क्रॉसिंग आणि लेन मार्किंगची कामे ही कामे होणार आहेत.

हा प्रकल्प डिसेंबर 2025 पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती महापालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे.



**स्मारक प्रकल्पाचा खर्च आणि पूर्णता कालावधी**

**स्मारक व मैदानाचा एकूण खर्च** : १५ कोटी रुपये

**प्रकल्प पूर्ण होण्याचा अंदाजे कालावधी**: एप्रिल २०२६ पर्यंत

**स्थान**: शिवाजी मैदान, ठाणे

**उंची**: ४३ मीटर

**अंदाजे बजेट**: ११ कोटी रुपये

**सुविधांचा समावेश** : उद्यान, दर्शनी सजावट, बैठक व्यवस्था, माहिती फलक




# ठाण्यात 'स्पेस एज्युकेशन लॅब'ची निर्मिती

## 'इस्त्रो'च्या स्पेस ट्यूटर प्रोग्राम अंतर्गत प्रयोगशाळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे** : ठाण्यातील 'अंबर इंटरनॅशनल स्कूल' आणि 'भारतीय अवकाश संशोधन संस्था' अर्थात इस्रोच्या स्पेस ट्यूटर प्रोग्रामअंतर्गत व्योमिका स्पेस अकॅडमी यांच्यात शनिवारी (ता. २८) सामंजस्य करार करण्यात आला. या करारान्वये मुंबई महानगर क्षेत्रातील (एमएमआर) पहिली स्पेस एज्युकेशन लॅब ठाण्यातील 'अंबर इंटरनॅशनल स्कूल' येथे लक्ष्मण कदम यांच्या नेतृत्वाखाली उभारण्यात येणार आहे.

ठाण्यातील तसेच मुंबई महानगर क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधन क्षेत्राची कवाडे खुली करून देण्याच्या हेतूने शारदा एज्युकेशन सोसायटीच्या अंबर इंटरनॅशनल स्कूल येथे स्पेस एज्युकेशन लॅबची निर्मिती करण्यात येणार आहे. इस्रोच्या स्पेस ट्यूटर प्रोग्रामअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या लॅब निर्मितीबाबत शनिवारी अंबर इंटरनॅशनल स्कूल आणि व्योमिका स्पेस अकॅडमी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी अंतराळ संशोधन क्षेत्राचे अभ्यासक डॉ. प्रतीक मुणगेकर, व्योमिका स्पेस अकॅडमीचे गोविंद यादव, शारदा एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. प्रदीप ढवळ, अंबर इंटरनॅशनल स्कूलचे संचालक लक्ष्मण कदम, शारदा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विलास ठुसे, कल्पेश जाधव (प्रोग्रॅम आणि ॲडमिन हेड), दिलीप त्रिपाठी यांच्यासह दूरदृश्यप्रणालीद्वारे इस्रोचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. टी. एन. सुरेशकुमार तसेच अंबर इंटरनॅशनल स्कूलमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. या वेळी इस्रोचे प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. टी. एन. सुरेशकुमार यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित राहून या सामंजस्य कराराबद्दल संबंधितांचे अभिनंदन करून प्रयोगशाळेच्या निर्मितीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच अशा प्रयोगशाळांमुळे भारताचे अंतराळ संशोधन क्षेत्रातील भविष्य उज्ज्वल होणार आहे. या प्रयोगशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि विज्ञानाची आवड निर्माण होईल, असा विश्वास डॉ. टी. एन. सुरेशकुमार यांनी व्यक्त केला.






# गीतासार



**अध्याय १४**

**गुणत्रयविभागयोगः**

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते । स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ १४-२६ ॥

आणि जो पुरुष अव्यभिचारी भक्तियोगाने मला निरंतर भजतो, तो सुद्धा या तिन्ही गुणांना पूर्णपणे उल्लंघून सच्चिदानंदघन ब्रह्माला प्राप्त होण्यास योग्य ठरतो. ॥ १४-२६ ॥

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च । शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ॥ १४-२७ ॥

कारण त्या अविनाशी परब्रह्माचा, अमृताचा, नित्य धर्माचा आणि अखंड एकरस आनंदाचा आश्रय मी आहे. ॥ १४-२७ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥१४॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील गुणत्रयविभागयोगः नावाचा हा चौदावा अध्याय समाप्त झाला. ॥ १४ ॥

# अनुसूचित जमातीचे आरक्षण वाढवताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागता कामा नये



**– अनिल नाचपल्ले**

पेण : सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गाच्या १० टक्के आरक्षणासह आदिवासी बहुल जिल्ह्याकरिता जिल्हास्तरीय गट क आणि ड संवर्गातील सरळ सेवा पदे भरण्यासाठी सुधारित आरक्षण निश्चिती व बिंदू नामावली विहित करण्यासंदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती गठित करण्यात आली असून त्यानुसार सुधारित आरक्षण निश्चित करताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागण्याची भीती निर्माण झाली आहे.

शासकीय सेवेतील गट क व गट ड दर्जाची पदे भरताना आदिवासी बहुल जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना अधिक लाभ व्हावा यासाठी १ सप्टेंबर १९९७ व २५ ऑगस्ट २००२ च्या शासन निर्णयाअन्वये आरक्षणाच्या मर्यादित बदल करण्यात आला. त्यानुसार गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नाशिक, धुळे, नंदुरबार, रायगड व पालघर या आठ जिल्ह्यातील अनुसूचित जमातीचे आरक्षण ७ टक्के वरून २४% टक्यापर्यंत वाढवण्यात आलेले आहे. नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर २२ टक्के, रायगड ९%, यवतमाळ १४%, चंद्रपूर १५ टक्के व गडचिरोली २४ टक्के याप्रमाणे अनुसूचित जमातीच्या आरक्षण वाढविण्यात आले. त्यासाठी ओबीसी, एनटी, व्हिजे, एसबीसी व एससी प्रवर्गाचे आरक्षण कमी करण्यात आले. यामध्ये ओबीसीचे आरक्षण गडचिरोली ६ टक्के, चंद्रपूर ११%, यवतमाळ १४%, नाशिक, धुळे, नंदुरबार व पालघर प्रत्येकी ९% याप्रमाणे कमी करण्यात आले.दुसरे म्हणजे हे आठही जिल्ह्यात पेसा क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्यामुळे राज्यपालाच्या ९ जून २०१४ च्या अधिनियमामुळे पेसा क्षेत्रात वर्ग ३ व ४ च्या १७ सवर्गीय पदे भरताना शंभर टक्के आदिवासी मधूनच भरले जातात. त्यामुळे ओबीसी सहित इतर प्रवर्गाचे आरक्षण शून्य टक्के झालेले आहे.अशा प्रकारे ओबीसी समाजावर अन्यायाची शृंखला सुरू असून ओबीसी समाजाला संपूर्णपणे नेस्तनाबूत करण्याचा शासनाचा प्रयत्न दिसून येत आहे. हा शासनाचा हा कुटील डाव राष्ट्रीय बहुजन ओबीसी शिक्षक संघ हानून पाडणार असे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल राजपल्ले यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदन पत्रकात म्हटले आहे

ते पुढे म्हणतात की १ सप्टेंबर १९९७ व २५ ऑगस्ट २००२ या शासन निर्णयाद्वारे कमी केलेले आरक्षण पूर्ववत १९% करण्या यावे यासाठी विविध प्रकारची आंदोलने करण्यात आलीत, शेवटी ठाकरे सरकारने जून २०२० रोजी मंत्री छगन भुजबळ यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती नेमून २३ सप्टेंबर २०२१ रोजी आदिवासी बहुल जिल्ह्यातील गट क व गट ड च्या नोकर भरतीचे आरक्षण वाढविण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे ३ जानेवारी २०२२ रोजी सुधारित बिंदू नामावली विहित करण्यात आली. या बिंदू नामावलीनुसार नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर या जिल्ह्यात ओबीसीचे आरक्षण १५ टक्के, यवतमाळ १७ टक्के, चंद्रपूर १९% तर गडचिरोली जिल्ह्यात १७% करण्यात आले. आता महाराष्ट्र शासनाने एसईबीसी साठी सरळ सेवा पदभरतीत व शैक्षणिक संस्थातील प्रवेशास १० टक्के आरक्षण लागू केले आहे. त्यानुसार आदिवासी बहुल जिल्हा करिता सुधारित आरक्षण व बिंदू नामावली विहित करण्याच्या अनुषंगाने २३ मे २०२५ रोजी उपाययोजना सुचवण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती गठित करून एक महिन्यात उपायोजना सुचवण्याचे निर्देश दिले आहे. त्यामुळे या ८ जिल्ह्यात एसईबीसी चे १० टक्के आरक्षण लागू करताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागू शकतो अशी चिंता ओबीसी संघटना व जात संघटनांनी व्यक्त केली आहे. पूर्व विदर्भातील अनेक जिल्ह्यात ओबीसींची लोकसंख्या सर्वाधिक आहे त्या तुलनेत एसईबीसी ची संख्या फार कमी आहे. गडचिरोली जिल्ह्यात तर अगदी नगण्य आहे, असे असतानाही जिल्ह्यातील ओबीसींचे आरक्षण कमी करून एसईबीसीला देण्याचा प्रयत्न झाल्यास तो ओबीसी वर फार मोठा अन्याय होणार आहे. गट क व गट ड सरळ सेवा भरतीमध्ये कुठल्याही जिल्ह्यातील उमेदवार दुसऱ्या जिल्ह्यात अर्ज करू शकत असल्यामुळे ओबीसी उमेदवारांचा हक्क डावलला जाण्याची भीती राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाने व्यक्त केली आहे. असे झाल्यास राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ व इतर समविचारी संघटनेच्या वतीने महाराष्ट्रभर सविंधानीक मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी दिला आहे. तरी शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून ओबीसीवर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी विनंती या निवेदनाद्वारे करण्यात येत आहे.

# सोशल मिडिया आणि शालेय विद्यार्थी : आधुनिक वास्तव

### ३० जून जागतिक सोशल मिडिया दिन आहे

**लेखक**
**अजय लक्ष्मीबाई लिंबाजी पाटील**
**मुख्याध्यापक**
**जिल्हा परिषद केंद्र शाळा, राहनाळ**

आजच्या डिजिटल युगात सोशल मिडिया ही केवळ माहितीची देवाण-घेवाण करणारी जागा उरलेली नाही, तर ती एक नवी संस्कृती, नव्या विचारांची दिशा, आणि अनेकांसाठी आयुष्याला चालना देणारी प्रेरणा बनली आहे. मात्र या तंत्रज्ञानाचा प्रभाव सर्वात अधिक जाणवतो तो शालेय विद्यार्थ्यांमध्ये. त्यांच्यासाठी हे माध्यम शिक्षणाचे साधनही आहे आणि विरंगुळ्याचा मार्गही. पण या स्वातंत्र्याच्या पंखांना शहाणा उपयोग हवा, अन्यथा हे आभासी जग वास्तवाला गिळून टाकते.

**सोशल मिडियाचे सकारात्मक पैलू :**
सोशल मिडियाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे क्षणार्धात जगाशी संपर्क साधणे. विद्यार्थ्यांना आज केवळ पुस्तकांपुरते मर्यादित रहावे लागत नाही. अभ्यासाचे व्हिडिओ, विज्ञान प्रकल्प, गणिती सूत्रांचे सोपे स्पष्टीकरण, ऐतिहासिक घटनांचे थ्री-डी मॉडेल्स, भाषेचे ऑनलाईन वर्ग — हे सर्व काही अगदी एका क्लिकवर उपलब्ध आहे. शालेय अभ्यासक्रमाबाहेरही अनेक गोष्टी शिकता येतात – वाचन, कोडिंग, वक्तृत्व, शुद्धलेखन, किंवा नवनवीन भाषा. विद्यार्थ्यांमध्ये नव्या कौशल्यांची जाणीव होते. सोशल मिडिया हे केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर सर्जनशीलतेचं व्यासपीठ आहे.

**समाजाशी संवादाचा नवा मार्ग :**
आजचा विद्यार्थी केवळ आपल्या गावापुरता सीमित नाही. जगभरातल्या विद्यार्थ्यांशी चर्चा, आंतरराष्ट्रीय वेबिनार्स आणि विचारमंच यामधून तो जागतिक दृष्टिकोन विकसित करतो. यातून व्यक्तिमत्त्व घडते, नेतृत्वगुण वाढतात, आणि नव्या संधींच्या दारात प्रवेश मिळतो.

**दुष्परिणामांची सावली :**
परंतु या चकाकत्या जगामागे एक सावली आहे — व्यसनाची. सोशल मिडियाचा अतिरेकी वापर हा शालेय विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक आरोग्यास अपायकारक ठरतो. अनेक विद्यार्थी सतत मोबाइल हातात घेऊन बसतात. अभ्यासापेक्षा रील्स, गेम्स, मेसेजेस अधिक महत्त्वाचे वाटू लागतात. त्याचा परिणाम म्हणजे – एकाग्रतेचा अभाव, झोपेचे त्रास, डोळ्यांचे विकार, नैराश्य, आणि आत्ममूल्य कमी होणे. तसेच, सोशल मिडियावर दाखवले जाणारे आदर्श आयुष्य, सौंदर्याच्या कल्पना, प्रसिद्धीची चढाओढ — या साऱ्यांमुळे विद्यार्थी आत्मभान विसरतात. त्यात सायबर बुलिंग, चुकीची माहिती, आणि अनैतिक मजकूर यांचा धोका अधिकच गंभीर ठरतो.

**सुसंवाद आणि सजगतेची गरज :**
या माध्यमाचा योग्य उपयोग व्हावा यासाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात खुला संवाद आणि जागरूकतेची गरज आहे. पालकांनी मुलांशी संवाद साधावा, त्यांना मार्गदर्शन करावे. शिक्षकांनी डिजिटल साक्षरतेबाबत शाळेतूनच योग्य दृष्टिकोन विकसित करावा. विद्यार्थ्यांनी स्वअनुशासन पाळून, सोशल मिडियाचा अभ्यास व व्यक्तिमत्त्वविकासासाठी उपयोग करावा. महत्त्वाचे - सोशल मिडिया हे एक प्रभावी साधन आहे. त्याचा योग्य वापर विद्यार्थ्यांचे भवितव्य उजळवू शकतो, तर अतिरेकी व गैरवापर त्यांना अंधारात लोटू शकतो.

जागतिक सोशल मिडिया दिनानिमित्त आपण सर्वांनी हा विचार करावा की – "सोशल मिडिया हे साधन आहे की स्वामी?" याचे उत्तर आपल्याच वागणुकीत दडलेले आहे.

# डबेवाल्यांची सेवा महागली

## सेवा शुल्कात २०० रुपयांची वाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : नोकरदारांसाठी आधार असलेली डबेवाल्यांची सेवा २०० रुपयांनी महागली आहे. जूनपासून नवा दर लागू होणार आहे, अशी माहिती नूतन मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स चॅरिटी ट्रस्टचे अध्यक्ष उल्हास मुके यांनी दिली. मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स असोसिएशन आणि नूतन मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स चॅरिटी ट्रस्ट (मुंबई डबेवाला) कडून ही सेवा अखंड सुरू असते. महागाईचा वाढता भार आणि प्रवासातील जोखीम या पार्श्वभूमीवर जून २०२५ पासून डब्याच्या दरात २०० रुपये वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मुके यांनी सांगितले. हा निर्णय भावनिकदृष्ट्या कठीण होता; मात्र अधिक चांगली सेवा देण्यासाठी हे आवश्यक आहे, असे मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स असोसिएशनचे अध्यक्ष रामदास करवंदे म्हणाले.

**आषाढी एकादशीला सुट्टी**
संतांच्या परंपरेला आणि वारकरी संप्रदायाशी घट्ट नाते असलेल्या डबेवाल्यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी एकादशीला सेवा एक दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या दिवशी सर्व डबेवाले विठूरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर यात्रा करणार असल्याने सेवा एक दिवसासाठी थांबवण्यात येणार आहे.

# 'महसूल अधिकाऱ्यांची हस्तपुस्तिका'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : 'महसूल अधिकाऱ्यांची हस्तपुस्तिका'च्या दोन खंडांचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विधान भवन येथे झाले. ही पुस्तिका राज्य प्रशासनासाठी एक अभूतपूर्व व महत्त्वपूर्ण पाऊल असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या 'कर्मयोगी भारत' या उपक्रमाला बळ देणारी आहे, असे सांगून अधिकर्त्यांबरोबरच नागरिकांना देखील ही मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी व इतर महसूल अधिकारी यांना विविध कामे करताना सुलभतेसाठी कायदे व नियम यासंदर्भातील हँडबुक तयार करण्याचा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला होता. त्यानुसार महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्यासह जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जळगावचे अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे तसेच कोकण विभागाचे सहायक आयुक्त रविंद्र पवार यांनी या पुस्तकाचे संपादन केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या हस्तपुस्तिकांच्या कामाचे कौतुक केले.विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या दोन खंडांमध्ये महसुली कामे (खंड 1) आणि बिगर महसुली कामे (खंड 2) यांचा समावेश असून एकूण 24 प्रकरणे असल्याची माहिती दिली.

# मुरबाड मध्ये म्हाडस सजेच्या तलाठीचा मदतनीस ए.सी.बीच्या जाळ्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील म्हाडस तलाठी जसेच्या तलाठी सौ. वैशाली रामभाऊ गडदे यांनी बांधिवली येथे राहणारे एकनाथ नामदेव भोईर यांच्याकडे वडिलोपार्जित जमिनीच्या फेरफार नोंद करण्याकामी 2000 हजाराची लाच मागितली होती.

एकनाथ नामदेव भोईर हे गरिब शेतकरी कुटंबातील असून ते माहिती अधिकार महासंघाचे कार्यकर्ते म्हणून काम करतात.

अनेक दिवस आपले जमिनीचे काम होत नाही म्हणून वैतागलेले भोईर यांनी अखेर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांच्याकडे संबधित तलाठी यांची तक्रार केली. त्यानुसार दि.27 जुन 2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मुरबाड तहसिल कार्यालयाच्या आवारात सापळा लावला होता.परंतु लाच घेण्यासाठी स्वतः तलाठी वैशाली गडदे न येता

**तलाठी वैशाली गडदे मात्र फरार**

त्यांनी त्यांचा खाजगी मदतनीस म्हणून काम करणारा बाळू एगडे याला पाठवले .सदर फिर्यादीने बाळू एगडे नावाच्या मदतनीस कडे दोन हजाराची लाच दिली असता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याला रंगेहात पकडले असून चौकशीसाठी ताब्यात घेऊन घटनेचा रितसर पंचनामा मुरबाड पोलीस स्टेशन येथे करण्यात आला. व प्रथम आरोपी म्हणून तलाठी वैशाली गडदे व दुसरा आरोपी बाळू एगडे यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम 7, 7अ,व 12 नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दरम्यान बाळू एगडे पोलीसांच्य ताब्यात असून मुख्य आरोपी वैशाली गडदे हिचे मुरबाड मधिल राहते घर सिल केले असून ती फरार असल्याने लाचलुचपत पथक तिचा शोध घेत आहेत.

# आरोग्य

## सकाळी लवकर उठणे : आजारांपासून मुक्ती

आरोग्य तज्ञांच्या मते, सकाळी लवकर उठणे ही एक चांगली सवय आहे. यामुळे तुमचा दिवस लवकर सुरू होण्यास मदत होते आणि तुमचे सर्व काम वेळेवर होते.सकाळी लवकर उठल्याने हे आजार बरे होऊ शकतात. सकाळी लवकर उठण्याचे फायदे जाणून घ्या.

**हृदय निरोगी राहते**
तज्ज्ञांच्या मते, जे लोक सकाळी लवकर उठून व्यायाम करतात त्यांना हृदयरोग होण्याची शक्यता कमी असते कारण लवकर उठून व्यायाम केल्याने आपल्या शरीरातील रक्ताभिसरण सुधारते आणि सुधारते, ज्यामुळे तुमचे हृदय निरोगी राहते आणि सुरळीत काम करत राहते.

**वजन कमी होते**
सकाळी लवकर उठल्याने तुम्हाला व्यायाम करण्यासाठी आणि निरोगी नाश्ता करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. नियमित व्यायाम आणि निरोगी अन्न वजन कमी करण्यासाठी प्रभावी आहे.

**मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर**
सकाळी लवकर उठणे मधुमेहाच्या रुग्णांसाठी देखील फायदेशीर आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की सकाळी लवकर उठल्याने चयापचय गतिमान होते आणि रक्तातील साखरेची पातळी संतुलित होते. सकाळी उठून हलका व्यायाम किंवा चालणे केल्याने शरीर इन्सुलिनचा वापर चांगल्या प्रकारे करते.

**पचनसंस्था देखील सुधारते**
सकाळी लवकर उठल्याने पचनसंस्था देखील चांगली राहते. तुम्हाला सांगतो की, लवकर उठल्याने शरीराचे सर्व भाग सक्रिय होतात. सकाळी उठून पाणी पिणे, चालणे आणि वेळेवर शौच केल्याने देखील बद्धकोष्ठता, गॅस, ॲसिडिटी सारख्या समस्यांपासून आराम मिळतो. त्यामुळे सकाळी लवकर उठणे हे शरीरासाठी रामबाण उपायापेक्षा कमी नाही.

# भाषांची सक्ती करायचीचं असेल तर बोली भाषांची करावी

### आगरी भूमिपुत्र साहित्यिकांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / **कल्याण** : सरकारला भाषांची सक्तीचं करायची असेल तर पाठयपुस्तकात बोली भाषांची करावी अशी मागणी आता होऊ लागली आहे. यासाठी ठाणे, रायगड जिल्ह्यातील आगरी आणि भूमिपुत्र साहित्यिकांनी मागणी केली. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांना तीन भाषांचा अभ्यास पहिली पासून करावा लागणार आहे. या तीन भाषांमध्ये हिंदीचा समावेश करण्यात आला आहे. मात्र या निर्णयाला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विरोध दर्शविला आहे. येत्या ५ जुलैला मुंबईत ठाकरेंनी मराठी माणसाच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनाला राजकीय क्षेत्रासह साहित्य क्षेत्रातून देखील वाढता पाठिंबा मिळत आहे. आगरी साहित्यिकांनी देखील या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला असून ५ जुलैच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन समाजबांधवांना करण्यात आलं आहे. दरम्यान आगरी, कोळी, मालवणी, कोकणी आणि अहिराणी अश्या बोली भाषा आहेत. सरकारला भाषांची सक्तीचं करायची असेल तर पाठयपुस्तकात बोली भाषांची करावी अशी मागणी आगरी साहित्यिक सर्वेश तरे यांनी केली आहे.

## साकिब नाचन यांच्या मृत्यूची बातमी समजताच

# पडघाच्या बोरवली गावात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी तालुक्यातील पडघा आणि बोरवली गावातील रहिवासी साकिब नाचन यांची २५ जून रोजी अचानक तब्येत बिघडल्याने त्यांना दिल्लीतील दीनदयाळ उपाध्याय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज त्याच्या मृत्यूचे वृत्त समजताच पडघा पोलिसांनी सुरक्षेसाठी पडघा आणि बोरवली गावात पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे.



भिवंडी तालुक्यातील पडघा येथील बोरवली गावचा रहिवासी साकिब नाचन हा मुंबई सेंट्रल, विलेपार्ले, मुलुंड रेल्वे स्थानकांवर झालेल्या बॉम्बस्फोटात सहभागी होता. साकिब ला दहशतवादी प्रकरणात दोषी ठरवण्यात आले होते. त्यामुळे २००३ च्या बॉम्बस्फोटात त्याचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाले होते. २०१७ मध्ये शिक्षा भोगल्यानंतर तो पुन्हा कट्टरतावाद्यांमध्ये सामील झाला. २०२३ मध्ये पुन्हा साकिबला आयसीआयएस मॉड्यूल प्रकरणात अटक करण्यात आली.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या हेरगिरी प्रकरणात त्याचा संबंध कुठे आहे का? महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाला याचा संशय आला आणि त्यानुसार त्यांनी त्याच्या घरावर छापा टाकला. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर या घरावर छापा टाकण्यात आला. यावेळी साकिबच्या खात्यात परदेशातून आणि भारतातून मोठ्या प्रमाणात पैसे आले होते. यात बोरिवलीतील अन्य कोणाचा सहभाग आहे का, याचा शोध घेण्यासाठी छापे टाकण्यात आले. साकिब हा बंदी घालण्यात आलेल्या सिमी (सिमी) या दहशतवादी संघटनेचा सदस्य आहे. मागील आठवड्यात साकिब नाचन यांची प्रकृती बिघडली आणि चिंताजनक झाली होती त्याच्यावर दिल्लीतील दीनदयाळ शासकीय रुग्णालयात उपचार सुरू होते. या पार्श्वभूमीवर ठाणे ग्रामीण आणि स्थानिक पडघा पोलिस ठाण्याने बोरिवली गावात व परिसरात सुरक्षेसाठी पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी.
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in



जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558


# आजचे राशि भविष्य



**मेष**
काही काम अपूर्ण राहू शकतात आणि ते पूर्ण करण्यात अडचण येऊ शकते.कायदेशीर बाबींमध्ये सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

**वृषभ**
कामाच्या ठिकाणी कोणतेही काम सोपवले असल्यास, त्यात हलगर्जीपणा करू नका. तुम्ही तुमचे काम पूर्ण करण्याचा पूर्ण प्रयत्न कराल.

**मिथुन**
आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश मिळेल. भागीदारीत कोणतेही काम करून तुम्हाला चांगले लाभ मिळू शकतात.

**कर्क**
करिअरबाबत निर्णय घ्यावा लागेल.तुमच्या शारीरिक समस्यांमुळे तुम्ही चिंतेत असाल, कामाच्या ठिकाणी स्वतःला चांगले सिद्ध करण्याचा प्रयत्न कराल.

**सिंह**
तुमचे प्रयत्न यशस्वी होतील.आज फसवणूक होऊ शकते. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करणाऱ्या लोकांना चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या**
तुमच्या शारीरिक समस्यांमुळे तुम्ही चिंतेत असाल. डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्या.तुमची फसवणूक होण्याची शक्यता आहे.

**तूळ**
कोणतीही मोठी गुंतवणूक केली असेल तर त्यामुळे तुमचे काही नुकसान होऊ शकते. तुमची कोणतीही जुनी चूक तुमच्या कुटुंबियांच्या समोर येऊ शकते.

**वृश्चिक**
घाईघाईने कोणताही निर्णय घेऊ नका.तुमची कोणतीही इच्छा पूर्ण होऊ शकते आणि जर तुम्ही काही उद्देशाने बाहेर जात असाल तर ते पूर्ण होईल.


**धनु**
प्रगतीच्या मार्गात येणारे अडथळे दूर केले जातील आणि तुमच्या मुलाच्या शिक्षणाशी संबंधित काही समस्या असतील तर त्या दूर केल्या जातील.

**मकर**
काही कामे पूर्ण न झाल्यामुळे तुम्हाला अडचणींना सामोरे जावे लागेल.तुम्हाला एखाद्या खास व्यक्तीला भेटण्याची संधी मिळेल आणि यश मिळेल.

**कुंभ**
आईच्या तब्येतीची काळजी घेणे आवश्यक आहे. तुमचे नुकसान होण्याची शक्यता दिसते.कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यात अडचणी येतील.

**मीन**
कामाच्या ठिकाणी कोणी सल्ला दिला तर तुम्ही त्याचा सल्ला विचारपूर्वक पाळावा. काही काम विचारपूर्वक करा, अन्यथा समस्या उद्भवू शकतात.

तेथे कर माझे जुळती



# दादाभाई नौरोजी पुण्यतिथी

**(४ सप्टेंबर १८२५ - ३० जून १९१७)**

पारतंत्र्याच्या काळात आपला देश स्वावलंबी व्हावा यासाठी आयुष्यभर झटणारे बुद्धिमान अर्थतज्ज्ञ व गणित या विषयाचा व्यासंग असणारे आदर्श देशसेवक तसेच भारताच्या आर्थिक शोषणाचा नवा पैलू जगा समोर आणणारे दादाभाई नवरोजी यांचा परिचय होणे क्रमप्राप्त आहे.

दादाभाई यांचा जन्म मुंबई येथे ४ सप्टेंबर १८२५ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव नौरोजी पालनजी दोरदी आणि आईचे नाव माणकबाई असे होते . दादाभाई चार वर्षांचे असतांनाच त्यांचे वडील वारले. मग त्यांच्या आईनेच त्यांच पालनपोषण व शिक्षण केले . त्यांच्यावर उत्तम संस्कार ही केले. दादाभाईनी एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशन या संस्थेत शिक्षण घेतले. त्यांची बुद्धिमत्ता पाहून त्यांचे शिक्षक त्यांना 'भारताचे आशास्थान 'असे म्हणत .शिक्षण पूर्ण केल्यानंतर दादाभाईनी शिक्षकाचा पेशा स्वीकारला . ते गणिताचे प्राध्यापक झाले . याच सुमारास दादाभाई सार्वजनिक कार्यात भाग घेऊ लागले.

सन १८५१ मध्ये दादाभाईनी ' रास्त गोफ्तार ' नावाचे वृत्तपत्र काढले. या वृत्तपत्रातून ते लोक जागृतीचे कार्य करू लागले. त्यानंतर पुढच्या वर्षी त्यांनी 'बॉम्बे असोसिएशन ' या संस्थेच्या स्थापनेत जगन्नाथ शंकरशेट यांच्याबरोबर पुढाकार घेतला. या संस्थेने ब्रिटिश पार्लमेंट कडे मागणी केली, की इंग्रज सरकारने भारतीयांच्या मताची कदर केली पाहिजे आणि उच्च अधिकार पदांवर भारतीयांना स्थान दिले पाहिजे.

दादाभाईनी इंग्लंडमध्ये ' ईस्ट इंडिया असोसिएशन ' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या शाखा मुंबई, कलकत्ता व चेन्नई या शहरांतही सुरु झाल्या. सदर संस्थेच्या सभांमधून भारताच्या जिव्हाळ्याच्या विषयांवर चर्चा होत असे.

भारताची गरिबी घालवण्यासाठी इंग्रज सरकारने व भारतातील लोकांनी काय केले पाहिजे हे दादाभाईनी परखडपणाने सांगितलं या संबंधात त्यांनी भाषणे दिली ,लेख लिहिले , पुस्तके लिहिली . राष्ट्राच्या जीवनात आर्थिक आणि शैक्षणिक गोष्टींना महत्त्वाचं स्थान असतं याकडे दादा भाईनी लोकांचं लक्ष आधी वेधले . 'पॉव्हर्टी अँड अन् - ब्रिटिश रुल इन इंडिया ' या दादाभाईनी लिहिलेला ब्रिटिश राजवटी खालील भारताच्या दारिद्र्याचा उहापोह करणारा ग्रंथ त्यावेळी फारच गाजला होता.

इंग्लंड मधल्या वास्तव्यात केलेल्या लोकसेवेमुळे दादाभाई ब्रिटिश पार्लमेंट मध्ये १९०२ मध्ये निवडून गेले होते . ब्रिटिश पार्लमेंट मध्ये निवडून गेलेले ते पहिले भारतीय होते .पार्लमेंट मध्ये केलेल्या प्रभावी भाषणातून त्यांनी ' 'भारतासारख्या गरीब देशावर इंग्रजांनी आपल्या शासनाचे ओझे लादू नये आणि भारताची पिळवणूक करू नये "असे स्पष्टपणे वारंवार सांगितलेलं होतं. त्यालाच ' शोषण सिद्धांत (Drain Theory) असे म्हणतात .भारतीय राष्ट्रीय सभा (इंडियन नॅशनल काँग्रेस )स्थापन करण्यात दादाभाईनी मोठा हातभार लावला होता . त्यांच्या या अजोड देशसेवेमुळेच त्यांना तीन वेळा काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा मानही मिळाला होता . सन १९०६ साली दादाभाई भारतात परत आले . स्वराज्य , स्वदेशी आणि बहिष्कार हा मंत्र काँग्रेसच्या व्यासपीठावरून दादाभाईनी प्रथम उच्चारला आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीची योग्य दिशा देशाला दाखवली . दादाभाईचं कार्यक्षेत्र केवळ राजकारणापुरतं मर्यादित नव्हतं .ते एक समाज सुधारक देखील होते . जातीबंधनं त्यांना मान्य नव्हती. स्त्रियांना शिक्षण मिळालं पाहिजे , स्त्री-पुरुषांचा दर्जा समान असला पाहिजे . त्यांना समान हक्क दिले पाहिजेत , या गोष्टींचा त्यांनी हिरिरीने

पुरस्कार केला .कार्यरत असतानाच ३० जून १९१७ रोजी दादाभाई नवरोजी यांचे निधन झाले . त्यांना श्रद्धांजली वाहतांना न्यायमूर्ती चंदावरकर म्हणाले - " दादाभाईच्या रूपाने भारताच्या क्षितिजावर जो सूर्य उगवला, तो आज जरी मावळला असला, तरी पुन्हा नव्या भारताच्या रूपाने तो उदयास येणार आहे . या नव्या भारताच्या उभारणीसाठीच ते जगले ,पराकाष्ठेन झटले आणि त्यांनी आपलं जीवनकार्य निष्ठेने पार पाडले."



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# वक्फ आणि मंदिरे यांसाठी वेगवेगळे कायदे का ?




**अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर**
राष्ट्रीय अध्यक्ष
हिंदु विधिज्ञ परिषद

'वक्फ बोर्ड'कडे नोंदणी झालेल्या वक्फच्या इमारतींवरील अतिक्रमण काढण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वापर करण्याची मुभा काँग्रेस सरकारने दिली आहे. त्यासाठी वर्ष 2008 मध्ये 'महाराष्ट्र शासकीय इमारती (उदकासन) कायदा (Maharashtra Government Premises (Eviction) Act, 1956)' या कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. मंदिरे आणि वक्फ हे दोन्ही धार्मिक स्थळे असूनही वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील अतिक्रमण हटवण्यासाठी सरकारी यंत्रणा दिली जाते; मात्र मंदिरांवरील अतिक्रमणासाठी विश्वस्तांना न्यायालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. अशा प्रकारे मंदिरे आणि वक्फ बोर्ड यांसाठी वेगवेगळा कायदा आहे. हे संविधानाच्या विरोधात आहे. वक्फ बोर्डाला जो लाभ दिला जातो, त्याप्रमाणे मंदिरालाही देण्यात यावा अन्यथा मंदिरांप्रमाणे वक्फ बोर्डाला देण्यात आलेला विशेष लाभ बंद करण्यात यावा, असे पत्र हिंदु विधिज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी महाराष्ट्र शासनाला लिहून यावर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

या पत्रामध्ये हिंदु विधिज्ञ परिषदेकडून पुढील प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत ....

१. सरकारी इमारती अथवा जागेमध्ये कुणी अनधिकृतरित्या रहात असेल, तर त्याला तिथून बाहेर काढण्यासाठी त्याच्याकडून भाडे अथवा तत्सम खर्च वसूल करण्यासाठी शासनाने वर्ष 1956 मध्ये महाराष्ट्र 'शासकीय इमारती (उदकासन) कायदा' पारित केला. त्याच्यात वेळोवेळी बदल झालेले आहेत.

२. काँग्रेस काळातील महत्त्वाचा बदल म्हणजे वर्ष 2008 मध्ये सरकारी जमिनीचा नियम वक्फच्या जमिनीलाही कायदा लागू करण्यात आला. याचा अर्थ असा की, वक्फच्या जमिनीवर जर अतिक्रमण झाले असेल, तर तर हटवण्यासाठी वक्फला न्यायालयात धाव घेण्याची आवश्यकता नाही तर शासकीय यंत्रणेने ते अतिक्रमण हटवण्यासाठी पावले उचलायची आहेत याउलट मंदिरांना दिवाणी न्यायालयांत धाव घ्यावी लागेल.

३. तसेच वक्फला स्वत:ची मालमत्ता अन्य कोणत्या कामासाठी वापरायची असेल, तर वक्फला दिवाणी न्यायालयात धाव घेण्याची आवश्यकता नाही. त्यांनी शासनाकडे तक्रार करायची आहे आणि त्या तक्रारीवर शासकीय यंत्रणा कारवाई करते आणि सदर जमीन/इमारत वक्फला रिकामी करून मिळवून देते. वक्फचे काही भाडे थकले असेल, तर तेही जमीनसाऱ्याच्या वसुली पद्धतीनेच वसूल करून मिळेल, अशी या कायद्यात तरतूद आहे.

४. सरकारी जमिनीप्रमाणे वक्फच्या जमिनींसाठी जी सुविधा सरकारने लागू केली, तशीच सुविधा सरकारने मंदिरांना मात्र दिली नाही. धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या मंदिरांच्या जमिनीवर कुणी आक्रमण केले, तर मंदिरांच्या ट्रस्टीना स्वत:ची जमीन मिळवण्यासाठी सरकारकडे नव्हे, तर न्यायालयात धाव घ्यावी लागते. वक्फ आणि मंदिरे यांच्यासाठी असा वेगळा नियम का ? वक्फप्रमाणे मंदिरांना लाभ का मिळत नाही ? एकतर सदर कायद्यामध्ये कलम २ मध्ये वक्फसारखाच मंदिरांच्या जमिनी व इमारती यांचा समावेश करण्यात यावा किंवा वक्फला यातून वगळण्यात यावे, अशी मागणी हिंदु विधिज्ञ परिषदेने केली आहे.

# बदलापूरच्या जांभळाची गोडी लंडनच्या बाजारात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे**: कर्नाटक येथील 'अपेडा' संस्थेमार्फत यंदा प्रथमच भारतीय जांभळे लंडनच्या बाजारपेठेत पोहोचली असून, त्यात दोन वर्षांपूर्वी भौगोलिक मानांकन मिळालेल्या बदलापूरच्या जांभळांचाही समावेश आहे. 'या हंगामात दोन क्विंटल जांभळे युरोपमध्ये पोहोचली. मागणीपेक्षा हा पुरवठा कमी होता, पण पुढील वर्षी मोठ्या प्रमाणात जांभळांची निर्यात होईल,' असा विश्वास बदलापूर जांभूळ परिसंवर्धन केंद्राचे आदित्य गोळे यांनी व्यक्त केला.

यंदा मे महिन्यातच पावसाचे आगमन झाल्याने बदलापूर परिसरातील जांभळांचे पीक मोठ्या प्रमाणात वाया गेले. तरीही देशातून पहिल्यांदाच युरोपमध्ये निर्यात होणाऱ्या जांभळांमध्ये बदलापूरच्या जांभळांचाही समावेश होता. त्यामुळे स्थानिक जांभूळ उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांनीही जांभूळ सातासमुद्रापार पोहोचल्याबद्दल संबंधितांचे अभिनंदन केले आहे.

बदलापूरच्या जांभळांना भौगोलिक मानांकन मिळाल्यानंतर परिसंवर्धन ट्रस्टच्या वतीने आता अधिक प्रमाणात जांभळांचे उत्पन्न घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी दरवर्षी जांभळांच्या रोपांची लागवड केली जात आहे. सर्वसाधारणपणे मेच्या अखेरीस आणि जून महिन्यात जांभळे पिकतात. याच काळात पावसाचे आगमन होते. वादळवारा आणि पावसामुळे जांभळे झाडावरून पडून वाया जातात. यंदा या लहरी हवामानाचा फटका जांभूळ पिकाला बसला. मे महिन्यात मुसळधार पाऊस पडल्याने हातातोंडाशी आलेली जांभळे वाया गेली. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही.

लहरी हवामानापासून संरक्षणाची गरज जांभळांवर कोड्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. तसेच कलम बांधणीचे कामही जिकिरीचे आहे. जांभळाचे पीक अधिक उत्तम पद्धतीने येण्यासाठी संशोधनाची आवश्यकता आहे. लहरी हवामानापासून जांभळांचे पिक कसे वाचेल, याबाबतही संशोधनाची गरज आहे. भारतात इतर फळांची स्वतंत्र संशोधन केंद्रे आहेत, पण जांभळाचे संशोधन केंद्र नाही. भौगोलिक मानांकन मिळालेल्या बदलापूर जांभळांचे संवर्धन होण्यासाठी याठिकाणी संशोधन केंद्र उभारले जावे, अशी मागणी आदित्य गोळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# 'माय मरो, मौसी जगो' बॅनर चर्चेचा विषय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयाला राज्यभरात विरोध केला जातोय. मनसे आणि ठाकरे गट या विरोधात 5 जुलैला मोर्चा काढणार आहेत. तसेच शिक्षक, पालक वर्गाकडूनही या गोष्टीला विरोध केला जातोय. या दरम्यान डोंबिवलीमधील प्रसिद्ध विद्यानिकेतन शाळेच्या बसवर लावलेला 'माय मरो... मौसी जगो!' बॅनर सध्या सोशल मीडियावर आणि शहरभर चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. मराठी भाषेवरील वाढता अन्याय, मुंबईतील मराठी लोकसंख्येचा घटता टक्का आणि शिक्षण संस्थांमधील




हिंदी सक्ती यावर या बॅनरद्वारे थेट आणि परखड भाष्य करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे, हा विरोध कुणा राजकीय पक्षाकडून नव्हे तर थेट शाळा प्रशासन, शिक्षक आणि पालकांच्या वतीने झाल्याचं चित्र समोर येतं आहे.

काय लिहले आहे बॅनरवर? : "माय मरो... 'मौसी' जगो! छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात, मराठी आणि मराठी भाषा ह्या हळूहळू, अडगळीत जाताना दिसून येत आहेत! मराठी माणसाच्या चाळी पाडून, आवाक्याबाहेर किमतीचे मोठमोठे टॉवर्स उभे रहात आहेत आणि तेथे राहाणे परवडत नाही, म्हणून तो मुंबई बाहेर फेकला जातोय. मुंबईतून मराठी माणसाचा टक्का कमी झाला आहे. मराठी चित्रपटांना, थिएटर्स मिळत नाहीत. रोजगार बाबतीत तर मराठी पाऊल पडते मागे ! आणि आता, सर्व शाळांमध्ये, १ ली-पासून, २० पेक्षा कमी विद्यार्थी असल्यास, हिंदी सक्तीची! ह्या राज्यात, १० वी पर्यंत, सर्व शाळांमध्ये मराठी अनिवार्य असूनही बऱ्याच हाय प्रोफाईल शाळा, ७/८ वी नंतर, मराठीला 'अलविदा' करतात ह्याबद्दल शिक्षण विभाग मूग गिळून गप्प आहेत", असं बॅनरमध्ये म्हटलं आहे.

# दूषित पाणी पुरवठ्यामुळे मुंबईकरांच्या आरोग्यावर परिणाम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबईच्या अनेक भागांत दूषित पाणीपुरवठा होत असून कमी दाबाने होत असलेल्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिक हैराण आहेत. पाणीपुरवठ्याच्या शेवटच्या टोकाला असलेल्या वसाहतींना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बोरिवली येथील गोराई परिसरात कायमस्वरूपी कमी दाबाने, दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. दूषित पाणीपुरवठा होत असलेल्या नवीन जलवाहिन्या टाकण्यासाठी पालिका आयुक्तांची परवानगी वेळेत न मिळाल्याने येथील नागरिक त्रस्त आहेत. लोकप्रतिनिधींकडे तक्रारी करूनही या समस्येवर तोडगा निघत नसल्याचे स्थानिकांनी सांगितले.

चेंबूर, गोवंडी, बोरिवली, विक्रोळी, कांदिवली, मालाड, कुर्ला या भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. अधूनमधून दूषित पाणी येत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. पालिकेच्या विभाग कार्यालयात तक्रारी करूनही त्याची दखल घेतली जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सध्या पावसाळी रोगाचे प्रमाण वाढले असताना दूषित पाण्यामुळे आजारपण वाढू लागल्यास मोठी समस्या निर्माण होईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

**प्रश्न सोडवण्याची आयुक्तांकडे मागणी**

ही समस्या सोडविण्याची मागणी आमदार संजय उपाध्याय यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे. सध्या तलावातील जलसाठा वाढला असून पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करा. दूषित पाणीपुरवठ्यावर उपाययोजना करा, या मागण्याही उपाध्याय यांनी केल्या आहेत.

# निळजे परिसरात भगवान जगन्नाथ यात्रा उत्साहात साजरी

## साई सिटी भव्य गृहप्रकल्पात उभारण्यात येणार भव्य श्री जगन्नाथ मंदिर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : निळजे,लोढाहेवन तसेच पलावा शहराजवळ साई सिटी भव्य गृहप्रकल्प उभारत असलेल्या ठिकाणी भव्य श्री जगन्नाथ मंदिर उभारण्यात येणार आहे. मंदिराच्या भव्य निर्माणासाठी साई सिटीचे डायरेक्टर संतोष दीक्षित व वीरेंद्र सिंग यांनी भगवान जगन्नाथ मंदिरासाठी जागा उपलब्ध करून दिल्याने ओडिया समाजातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

या ठिकाणी आता छोटे मंदिर असून त्यात भगवान जगन्नाथ यांचे वास्तव आहे. त्या ठिकाणी मागील दोन तीन वर्षांपासून छोटे मोठे उत्सव होत असतात. काही दिवसांतच या ठिकाणी एक भव्य दिव्य मंदिर उभारले जाणार असून महाराष्ट्र




राज्यात एक भव्य मंदिरामध्ये एकमेव असे हे भगवान जगन्नाथनाच्या मंदिराचे स्थान असणार आहे.

यावर्षी भगवान जगन्नाथ हर गुंडीचा मंदिर येथील ९ दिवस आपल्या स्थानापासून दरवर्षी प्रमाणे २७ जुन ते ५ जुलै २०२५ पर्यत त्यांच्या मावशीच्या घरी आज जात आहेत. आणि पुन्हा त्याच जल्लोषपूर्ण वातावरणात पुन्हा आपल्या निवासात ५ जुलै रोजी त्यांचे जल्लोषात साई सिटीच्या प्रांगणात असलेल्या मंदिरात आगमन होणार आहे. जल्लोषाच्या वातावरणात साई सिटीचे डायरेक्टर संतोष दीक्षित, विरेंद्र सिंग तसेच जगन्नाथ मंदिर कल्चरल चॅरिटेबल ट्रस्ट चे विश्वस्त एस एम गौडा यांनी भक्तगनांना व यात्रेत सामील झालेल्या असंख्य नागरीकाना शुभेच्छा दिल्या.

# राज्यातील २५ हजार शिक्षकांना जुनी पेन्शन कधी मिळणार ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजनेपासून महाराष्ट्रात २५ हजार कर्मचाऱ्यांना वंचित ठेवले आहे. शासनाच्या ३२ विभागातील १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ मिळत असून फक्त शालेय शिक्षण विभागावर अन्याय का? असा संतप्त सवाल शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधून होत आहे.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शासनाने टप्याटप्याने अनुदान दिले. २००५ नंतर शासनाने जुनी पेन्शन बंद केली. तरीही २००५ पुर्वी विना वेतन घेत अध्यापन करणारे शिक्षकांना जुन्या पेंशनसाठी आंदोलन करावे लागत आहे, ही शोकांतिका आहे. शासनाने १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांची विनाअनुदानित व अशंत अनुदानित शाळेतील सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरले जाते व त्यांना नियमित वेतन श्रेणी मिळते मग त्यांना जुनी पेन्शन का नाही. १० जुलै २०२० ला अधिसूचना काढली. अधिसूचना रद्द करण्यासाठी राज्यभर स संघटनेचे पदाधिकारी यांनी आंदोलन करून ती आधिसुचना ११ डिसेंबर २०२० ला शासनाने मागे घेण्यासाठी भाग पाडले.

नुकत्याच झालेल्या विधान परिषदेच्या नाशिक अमरावती औरंगाबाद, नागपूर आणि कोकण शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये जुन्या पेन्शनचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला पण ठरल्याप्रमाणे लोकप्रतिनिधींनी आश्वासनाच गाजर दाखवून निवडणुका आपल्या पदरात पाडून जुन्या पेन्शनचा मुद्दा बाजूला ठेवला. यातच विविध शिक्षक संघटनांच्या श्रेय वादावरून हा मुद्दा बाजूला पडत असल्याचे चित्र आहे. यासाठी २५ हजार शिक्षकांनी एकत्र येऊन तीव्र आंदोलन करणे गरजेचे आहे.

# आषाढी वारीत 'आसरा फाउंडेशन' व 'आरोग्यम'तर्फे मोफत आरोग्य सेवा

**८ कायरोप्रॅक्टिक थेरेपिस्ट व २५ डॉक्टरांचा सहभाग लोणद येथे सेवा उपक्रम**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या आषाढी वारी निमित्त वारकऱ्यांच्या सेवेसाठी ठाण्यातील आसरा फाउंडेशन व आरोग्यम् यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच इतर सामाजिक संस्थांच्या सहकार्याने, लोणद येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या सेवाभावी उपक्रमात ८ कायरोप्रॅक्टिक थेरेपिस्ट आणि २५ हून अधिक डॉक्टर यांनी आपला सहभाग नोंदवत वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली.



अनेक वारकऱ्यांना आवश्यक औषधे मोफत वितरीत करण्यात आली. या शिबिरात डॉ. पंकज जिरापुरे, डॉ. आशिष शिंदे, डॉ. अमोल साळुंखे, डॉ. दत्तात्रय राजे, डॉ. प्रशांत स्वामी, प्रतीक कांबळे यांच्यासह अमेरिकेतून खास या सेवेसाठी आलेले डॉ. राहुल वडके यांचा समावेश होता. आरोग्यम् संस्थेच्या संस्थापक शर्मिला सुतार यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले.

या सेवाकार्यातील अनुभव सांगताना आसरा फाउंडेशनचे विश्वस्त प्रदीप पाटील म्हणाले, "आषाढी वारी ही केवळ एक धार्मिक यात्रा नसून ती महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हे आमचे सामाजिक कर्तव्य मानतो. आरोग्यदायी शरीरामुळेच ते आपली वारी सुखरूप व यशस्वीपणे पूर्ण करू शकतात. ही सेवा देताना आम्हाला खूप समाधान लाभले."




## भिवंडीतील वकिलांच्या कार्यालयात घरफोडी

**लॅपटॉप सह रोख रक्कमेची चोरी..**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर परिसरात सोन्याचे दागिने चोरी व घरफोडी सारखे प्रकार घडत असतानाच शहरातील गायत्रीनगर नागाव येथील एका वकिलांच्या कार्यालयात चोरट्यांनी घरफोडी करीत तेथील दोन लॅपटॉप सह रोख रक्कम चोरी केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार भिवंडी तालुक्यातील वडुनवघर येथील रहिवासी सुदर्शन केशव पाटील यांचे शहरातील शांतीनगर नागाव - गायत्रीनगर परिसरातील साईबाबा मंदिराजवळ कार्यालय आहे. २१ जून रोजी सायंकाळी ४ ते ६ वाजताच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने बंद कार्यालयाच्या शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश करून कार्यालयातील दोन लॅपटॉप,रोख रक्कम सोन्याचे नाणे व तेथे सुरक्षिततेसाठी लावलेला सी सी टी व्ही कॅमेरा असा एकुण सुमारे ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी केला आहे.याप्रकरणी २७ जून रोजी वकील सुदर्शन पाटील यांनी केलेल्या तक्रारीवरून शांतीनगर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कल्याण आरटीओच्या विरोधात

## विधानभवनाच्या दालनात उपोषणाचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड मध्ये काही दिवसांपूर्वी आरटीओ आपल्या स्कॉर्पिओ गाडी खाटेघर गावालगतच्या एका झाडाखाली थांबवून मनमानी पध्दतीने कॅमेरेच्या कैदीत दंड आकारणी करतांना दिसली असून हायस्पिड फलक नसताना दंड आकारणी मुरबाड मधिल सामान्य नागरिकांवर करण्यात येत आहे. त्यातच एका पत्रकाराला टार्गेट करून त्याच्या कर्तव्यावर कार्यरत असताना घाईने हेल्मेट न घातल्याने पत्रकाराची गाडी पाहूनही कोणतेही माहिती न घेता ऑनलाईन दंड ठोठावले आहे.याच रस्त्यानी मोठया प्रमाणात प्रवासी येणे जाणे असताना तसेच माळशेज घाटातील ओव्हरलोड गाडया चालत असताना अपघाताचे प्रमाण कमी व्हावेत म्हणून तेथे प्रामुख्याने न थांबता मुरबाडच्या झाडाआड दंडात्मक कारवाई करता सज्ज होतात.याच कल्याण मुरबाड माळशेज महामार्गावर पोलीसांच्या खाजगी वाहनांवर पोलीस पाटी लावून गाडया चालू आहेत,बसेस मोठया प्रमाणात हायस्पिडला गाडया चालवतात त्यात अनेक वेळा अपघातही झालेत त्यातच बसेसच्या आयएनडी पाटी नाहीत,मुरबाड मध्ये रेती माती वाळूच्या ओव्हरलोड गाडया सुरू आहेत त्याकडे लक्ष वेधले जात नाहीत,बेकायदेशीर वाहने सुरू आहेत,लोकप्रतिनिधी तसेच पोलीसांना दंड मारले जात नाहीत त्यांच्या गाडी कॅमेरेत कैद होत नाहीत,ड्रायव्हींग लायसन्स देतांना नेमकी निकष पाहूनच दिले जाते की नाही ते आरटीओंना दिसत नाहीत परंतु याकडे लक्ष न वेधता सर्वसामान्य जनतेला टार्गेट करून दंड आकारन्याची ठोकशाही करतात याकडे राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी लक्ष वेधावे याकरिता पत्रकार कुणाल शेलार या पावसाळी अधिवेशनाच्या दालनात आमरण उपोषण करणार असल्याची भूमिका आज स्पष्ट केली असून सदरचे पत्र मुख्यमंत्री यांना पाठविले आहे. त्यामध्ये कल्याण आरटीओ अधिकारी यांनी मनमानी करून जी दंड वसूली केली आहे त्यांच्यावर नियमाचे पालन बेकायदेशीरपणे केले प्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करावे अशी प्रमुख मागणीचा समावेश आहे.

## कल्याण डोंबिवलीत स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत लावलेले सिसिटीव्ही कॅमेरे बंद

### ठाकरेंची शिवसेना जिल्हाप्रमुखांचे पालिका आयुक्तांना पत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : केंद्र सरकारच्या माध्यमातून कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीत स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत 44 कोटी निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले. 'शहरातील डोळे' अशी ओळख असलेले ओळख असलेले 60 ते 70 टक्के सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी पालिका आयुक्त अभिनव गोयल यांना दिलेले पत्रात नमूद केले आहे.



याबाबत कल्याण जिल्हाप्रमुख म्हात्रे म्हात्रे, कल्याण डोंबिवली शहरात कल्याण डोंबिवली स्मार्ट सिटी अंतर्गत ४४कोटी रुपये खर्च करून सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले.यातील ६०ते ७०टक्के सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची धक्कादायक माहिती आम्हाला मिळाली आहे. या संदर्भात आयुक्तांना पत्र देण्यात आले आहे. ६० ते ७० टक्के सीसीटीव्ही बंद असल्यामुळे पोलिसांना आरोपींना पकडण्यासाठी किंवा गुन्हे होण्यापासून वाचवण्यासाठी खूप मोठ्या अडचणी येत आहे. तसेच ट्राफिक कंट्रोल करण्यासाठी पोलिसांना अडचणी येत आहे.



यामुळे आयुक्तांना विनंती आहे मेंटेनन्स मुळे सीसीटीव्ही बंद होत असतील तर लवकरात लवकर सुरू करावे. सिमेंट कॉक्रिटीकरणामुळे सीसीटीव्हीचे केबल तुटल्याने सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. लवकरात लवकर हे सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करावे अशी विनंती जिल्हाप्रमुख म्हात्रे यांनी म्हटले आहे.




## सरकारी माती चोरी उघडकीस आणणाऱ्या पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : मांडा-टिटवाळा-वासुन्द्री या नव्या निर्माण होत असलेल्या रस्त्याच्या कामातील सरकारी माती चोरी प्रकरण बातमीच्या माध्यमातून उघडकीस आणणाऱ्या स्थानिक पत्रकाराला खुलेआम जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची गंभीर घटना समोर आली आहे. येथील स्थानिक पत्रकार अजय शेलार या पत्रकाराने काही दिवसांपूर्वी सरकारी मालमत्तेच्या गैरव्यवहारावर आधारित एक वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर, या प्रकरणाची चौकशी प्रशासन स्तरावर सुरु झाली. मात्र, याचा राग मनात धरून संबंधित माफियांनी सोशल मीडियावरून पत्रकाराविरुद्ध आक्षेपार्ह आणि धमकीजनक वक्तव्य केल्याचे निदर्शनास आले आहे.

२७ जून २०२५ रोजी संध्याकाळी ७:५७ वाजता, संदीप नाईक नामक इसमाने फेसबुक लाईव्हवर येत पत्रकाराचे नाव घेऊन थेट धमकी दिली. "पुन्हा बातमी केलीस तर बघून घेईन," असा थेट इशारा करत, जर पुढे पुन्हा काही प्रसिद्ध झालं, तर गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा स्वरूपाचे वक्तव्य करण्यात आले.



**फेसबुक लाईव्हवर थेट इशारा**

या प्रकरणामुळे पत्रकाराच्या जीवाला धोका निर्माण झाला असून, सामाजिक माध्यमांवर त्यांची बदनामी करून मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न सुरू आहे. संबंधित पत्रकाराने आपल्या तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, संदीप नाईक व त्याचे इतर तीन साथीदार हे स्थानिक माफियांच्या सांगण्यावरून कारवाई करत आहेत.

या घटनेनंतर, पत्रकाराने कल्याण तालुका पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करत पत्रकार संरक्षण कायद्यानुसार संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच, या धमक्यांमागे कोणते प्रभावशाली माती माफिया आहेत, याचा तपास करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.

तक्रारीची प्रत गृह राज्यमंत्री, ठाणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याकडेही पाठवण्यात आली आहे. हे प्रकरण केवळ एका पत्रकाराच्या सुरक्षेचे नसून, लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर होत असलेला हल्ला आहे. पत्रकार संघटनांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला असून, प्रशासनाने तातडीने कारवाई करून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

## जीवनदीप खर्डी महाविद्यालयाला जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे अजिंक्यपद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई विद्यापीठाचा युवा महोत्सव हा सगळया कॉलेज विश्वातील मोठा महोत्सव मानला जातो. मुंबई विदयापीठाच्या या ५७ व्या 'युवा महोत्सवात' जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने ( ठाणे / पालघर जिल्हा ग्रामीण झोन - VI ) जिल्हास्तरीय अजिंक्यपद ( चॅम्पियनशिप ) पटकावले आहे. वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजुषा, स्किट, एकपात्री अभिनय, पोस्टर मेकिंग, रांगोळी, मेहंदी अशा विविध कलाप्रकारात विद्यार्थी सहभागी झाले होते.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र घोडविंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे यांनी सांस्कृतिक विभागाचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## गढूळ पाणी व कचऱ्याच्या समस्येने वासिंदकर हैराण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**वासिंद** : शहरातील काही भागात येणारे गढूळ पाणी व रस्त्यालगत ठिकठिकाणी साचून असलेली कचऱ्याची समस्या येथील नागरिकांना भेडसावत आहे.

शहापूर तालुक्यात सर्वात सधन ग्रामपंचायत म्हणून वासिंद ग्रामपंचायतीकडे पाहीले जाते. शहरातील दिवसेंदिवस वाढत्या नागरीकरण व औद्योगिकरण आदी सोयीसुविधांमुळे येथील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. पूर्वेकडील भागात लगतच भातसा नदी पात्र, मध्य रेल्वे स्थानक व पश्चिमेकडे लगत मुंबई- नाशिक महामार्ग यामुळे येथे ठाणे, मुंबई आदी भागात नोकरी, येथील शिक्षण व कामधंद्या निमित्ताने बाहेरगावाहून मोठ्या प्रमाणात नागरिक येथे वास्तव्यास येत आहेत.

नवनवीन उभे राहत असलेले निवासी गृह संकूल, प्रकल्प व वसाहती यामुळे शहरातील या वाढत्या लोकसंख्येला विविध निर्माण होणाऱ्या समस्या या भेडसावत आहेत. शहरात सध्या अंदाजे ५० ते ६० हजार आसपास नागरी लोकसंख्या आहे. ऐन पावसाळ्यात काही भागात गढूळ पाणी पुरवठा होत असल्याचे ग्रामस्थांकडून सांगितले जात आहे. तर अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पसरलेले असल्याचे दिसून येते. ग्रामपंचायत विभागाकडून या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला जात असला तरी या समस्या पुन्हा निर्माण होत आहेत. मागील काही वर्षांपूर्वी शहरासाठी जलशुद्धीकरण केंद्र (फिल्टर प्लांट) पाणी योजना हाती घेतलेली असली तरी काही भागात याचा पाणी पुरवठा होत नाही तर येथील कचरा व्यवस्थापन समस्याही कायम सुटलेली नसल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, शहरात सातत्याने पाणी पुरवठा होत आहे. परंतु येथील वाढत्या लोकसंख्यामुळे जलशुद्धीकरण केंद्र अपुरा पडत आहे. तसेच कचरा व्यवस्थापनासाठी (डंपिंग ग्राउंड ) जागा घेतलेली आहे मात्र पावसाळ्यात येथे पक्या रस्त्याअभावी कचरा वाहतूक करणाऱ्या वाहने जात नसल्याने कचरा विल्हेवाटसाठी अडचण निर्माण होत असल्याचे सरपंच राजेंद्र म्हसकर यांनी म्हटले आहे.

## वडखळ पोलिसांकडून दोन लाखाचा गांजा जप्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत २५ जून रोजी पोलीस अधिकारी व पथक गुन्हे प्रतिबंधक गस्त करत असताना एस बी आय बँक समोर दोन इसम घाबरलेल्या अवस्थेत लगबगीने हातात बॅग घेऊन गल्लीतून जाताना दिसल्याने पोलिसांना संशय आल्याने पोलिसांनी पाठलाग करून त्यांची



झाडाझडती घेतली असतात त्यांच्याकडून सुमारे २ लाख ४६ हजार रुपये किंमतीचा ४ किलो ९२० ग्रॅम गांजा मिळून आला. सुशांत गौरंग साहू, वय ४२ वर्ष आणि गौरंग पुरुषोत्तम साहू वय ६३ वर्ष अशी या आरोपींची नावे असून त्यांना वडखळ पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. अधिक तपास वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

## माजी नगरसेवक निलेश म्हात्रे यांच्या प्रभागात मोफत वह्या वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आमदार श्री रविंद्र चव्हाण यांच्या माध्यमातून पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटपाचा, कार्यक्रम, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे माजी नगरसेवक निलेश चिंतामण म्हात्रे यांच्या पाथरली प्रभागात संपन्न झाला.शनिवार दिनांक 28 जून 2025 रोजी सकाळी 11 ते पाच च्या दरम्यान मोफत वया वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.

आमदार रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून डोंबिवली शहरात नेहमीच गोरगरिबांना आणि मध्यमवर्गीयांना मोफत शालेय वस्तू वाटप करण्यात येते. सदर कार्यक्रमात अनिल ठक्कर, सुरेश चव्हाण , महेंद्र म्हात्रे,मंगेश म्हात्रे. अशा अनेक कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.

### वर्तकनगर माध्यमिक विद्यालयात

## फिजिओथेरपी शिबीराचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या वर्तकनगर माध्यमिक विद्यालय, ठाणे येथे अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून विद्यालयाची माजी विद्यार्थिनी व फिजिओथेरपीस्ट डॉ.आदिती अहिरे व त्यांचे सहकारी यांनी ब्राह्मण शिक्षण मंडळाचे चिटणीस ॲड. श्री.केदार जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात फिजिओथेरपी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सर्व शिक्षकांची शारीरिक तपासणी करून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून प्राणायाम तसेच योगासनांचे विविध प्रकार प्रात्यक्षिकांसहित करुन घेण्यात आले.

योग शिक्षिका जस्मिन शहा व त्यांच्या सहकाऱ्यांनी शरीर निरोगी राहण्याच्या दृष्टीने आपला आहार-विहार कसा असावा ? आपली दिनचर्या कशी असावी? याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत योगाचे शास्त्रशुद्ध धडे दिले.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक आव्हाड, पर्यवेक्षक लोहार, कै.द.ल.मराठे प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती मोहिते, पूर्व प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जोशी आणि सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. योग दिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

## दोन गावठी पिस्टल आणि काडतूसासह सराईत गुन्हेगार जेरबंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहराचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल तारमळे यांना गुप्त खबरीने माहिती दिली की सचिन शिंदे रा. रोषन किराणा स्टोरचे बाजुला बंदरपाडा, कल्याण पश्चिम याचे ताब्यात दोन अग्नीशस्त्र व काडतुस आहेत. सदर मिळालेल्या बातमीचे अनुशंगाने दिनांक 25 जून 2025 रोजी 16:45 वा अधिकारी अंमलदार यांचेसह रोषन किराणा स्टोअर्स च्या बाजुला, मोहने रोड, बंदरपाडा, कल्याण पश्चिम याठिकाणी सापळा कारवाई करून दुखापत व अंमली पदार्थाचे गुन्हे दाखल असलेला रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार सचिन गोपी उर्फ गोकुळ षिंदे, वय 30 वर्शे, व्यवसाय फळविक्री,



रोषन किराणा स्टोअर्सचे बाजुला, मोहने रोड, बंदरपाडा, कल्याण पश्चिम हा कोणतातरी दखलपात्र स्वरूपाचा गंभिर गुन्हा करण्याचे इरादयाने बेकायदेशिर रित्या विनापरवाना

### खंडणी विरोधी पथकाची कारवाई

दोन गावठी बनावटीचे पीस्टल, 1 जिवंत काडतुस असा एकूण 1,00,500/- रूपये किमतीचे अग्नीशास्त्रासह त्यास ताब्यात घेण्यात आले असुन सदर आरोपीचे विरूद्ध खडकपाडा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सुनिल तारमळे हे करीत आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त,आशतोश डुंबरे, सह पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण,अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे ) डॉ. पंजाबराव उगले, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर बागडे, , सहायक पोलीस आयुक्त, विनायक घोरपडे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि सुनिल तारमळे, सपोनि कृष्णा गोरे, सपोपि भुषण कापडणीस, पोउपनिरी सुहास तावडे, सपोउपनिरी संदीप भोसले, पोहवा ठाकुर, पाटील,गायकवाड, जाधव, गडगे, राठोड, कानडे, पावसकर, हासे, मधाळे, हिवरे, वायकर, ढाकणे, पाटील, शेजवळ, भोसले यानी केली आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024